नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १३२ | Issue - 132 | वार सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ | Blow- Monday Date 29 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मराठवाड्यात अतिवृष्टीचा कहर; गोदावरी नदीला महापूर

## जायकवाडीचा विसर्ग वाढवला; ६ जणांचा मृत्यू, २१३ जनावरांचा बळी, शेकडो घरांचे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाल्याचं समोर आलं आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे. नांदेड जिल्ह्यात वीज पडून १ व्यक्तीचा मृत्यू झाला. धाराशिवमध्ये ३ जण वाहून गेले. तसेच नांदेड आणि बीडमध्ये प्रत्येकी १ अशा २ जणांचा मृत्यू झाला आहे. तर धाराशिव जिल्ह्यात ५ तर बीड जिल्ह्यात १ व्यक्ती जखमी झाली आहे.

अतिवृष्टीत एकूण २१३ जनावरे मृत्यूमुखी पडली आहेत. यामध्ये धाराशिवमध्ये ८१, जालना जिल्ह्यात ४० जनावरे दगावली. दुधाळ जनावरांपैकी ९८ मोठी आणि ८६ लहान जनावरे, तर ओढकाम करणारी २५ मोठी आणि ७ लहान जनावरे दगावली आहेत.

मराठवाड्यात एकूण ८९२ खाजगी मालमत्तांची पडझड झाली आहे. त्यापैकी धाराशिवमध्ये ६११, लातूरमध्ये ८९, छत्रपती संभाजीनगरमध्ये ७३, नांदेडमध्ये ५६, परभणीमध्ये ४२ आणि जालन्यात २१ घरांचे नुकसान झाले आहे.

सार्वजनिक मालमत्तेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४ रस्ते वाहून गेले आहेत. तसेच मराठवाड्यात एकूण ९ पूल वाहून गेले असून यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे ४, बीडचे ४ आणि परभणीतील १ पूल समाविष्ट आहेत. याशिवाय ८ शाळांचे नुकसान झाले असून धाराशिवमधील ६ आणि छत्रपती संभाजीनगरमधील २ शाळांचा समावेश आहे.

गोदावरीचे उगमस्थान असलेल्या नाशिक जिल्ह्यात दरवर्षी जोरदार पाऊस होतो. त्याच पाण्यामुळे संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात पाणीसाठा जमा होतो. मात्र, सध्या राज्यात सर्वदूर पाऊस होत आहे. त्यातच नाशिकमध्ये झालेल्या पावसाने गोदावरीला पूर आला आहे. पुढे संभाजीनगरमध्येही पाऊस सुरू झाल्यानं गोदावरीच्या पाण्यात मोठी वाढ झाली असून जायकवाडी पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे २७दरवाजे उघडण्यात आलेत. पुढे नांदेड जिल्ह्यातही पाऊस सुरू असल्यानं तिथंही गोदावरी नदी दुधडी भरून वाहत असून नदीकाठच्या गावांमधील शेतांमध्ये पाणी साचलं आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या जायकवाडी धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. जायकवाडी धरणातून सध्या २ लाख ९२ हजार क्युसेक वेगाने विसर्ग सुरू आहे. जायकवाडी धरणाच्या १८ नियमित आणि ९ आपत्कालीन दरवाजातून विसर्ग सुरू असून गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



## दुतोंड्या मारुती पूर्णपणे बुडाला, नाशिकमध्ये गोदावरीचे पाणी शहरात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिकमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. नाशिक शहरासह जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. यासोबतच नाशिकला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणाचे दरवाजे उघडले आहेत. या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. यामुळे नाशिक शहरात आता पाणी घुसण्यास सुरुवात झाली आहे. नाशिकमध्ये दुतोंड्या मारुती पाण्यात बुडाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गंगापूर धरणातून ९ हजार ८४८ क्युसेक वेगाने गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

नाशिकच्या रामकुंड परिसरात प्रचंड पाणी बघायला मिळत आहे. या परिसरातील दुतोंड्या मारुती कालपर्यंत पूर्ण दिसत होता. तसेच सकाळी त्याच्या छातीपर्यंत पाणी आलेलं होतं. पण



आता दुतोंड्या मारुती पूर्णपणे बुडाला आहे. दुतोंड्या मारुती हा पुराचा मापदंड समजला जातो. नाशिक आणि गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. यामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. गोदावरी नदीने आता रौद्र रुप धारण केलेलं बघायला मिळालं आहे. पाऊस थांबला नाही तर गोदावरीला महापूर येण्याची भीती आहे. या परिस्थितीत सर्वसामान्यांची काळजी घेणं, त्यांची सुरक्षितस्थळी रवानगी करणं हे प्रशासनापुढे आव्हान असणार आहे.

रामकुंड परिसरातील काही मंदीरं गोदावरी नदीत बुडाली आहेत. पुराचं पाणी शहरात घुसायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे नदीकाठी असणारी सर्व दुकानं खाली करण्यास सुरुवात झाली आहे. व्यापारी आपापल्या दुकानातील सामान घेऊन दुसरीकडे जात आहेत. संभाव्य धोका लक्षात घेता व्यापाऱ्यांनी हे पाऊल उचललं आहे. दुकानांमध्ये पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे. कपालेश्वर मंदीर ते संत गाडगेबाबा पुलाकडे जाणारा मार्ग हा नेहमीच रहदारीचा असतो. पण आज या ठिकाणी रस्त्याला नदीचं स्वरुप आलेलं आहे. यावेळी परिसरातील काही लहान मुलं हे टायर ट्युबचा वापर करत पोहण्याचा आनंद लुटताना बघायला मिळत आहे. पण पाऊस वाढला तर नदीकाठच्या नागरिकांसाठी धोका उद्भवू शकतो. यामुळे प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा आधीच दिला आहे.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर कोकण विभागातील जिल्ह्यांना अलर्ट मोडवर राहण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

ठाणे : कोकण किनारपट्टीवरील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांना पुढील २४ तासांसाठी रेड अलर्ट दिल्याने जिल्ह्यातील आपत्कालीन यंत्रणेला सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. कालपासून झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यासह कोकण विभागातील जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा आढावा घेतला. यावेळी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी त्यांनी जिल्हा प्रशासनाला सज्ज राहण्याचे तसेच मनुष्य व पशुहानी टाळण्यास सर्वोच्च प्राधान्याने दक्ष राहण्याचे निर्देश दिले. यावेळी कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पालघर जिल्हाधिकारी इंदू राणी जाखड, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि मुंबई, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, मीरा भाईंदर, वसई विरार, भिवंडी या महानगरपालिकांचे आयुक्त दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

## संपूर्ण कर्जमाफी जाहीर करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे नदी, नाले दुथडी भरुन वाहत आहेत. अनेक नद्यांना पूर आला आहे. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मुसळधार पावसामुळे गावांमध्ये पाणी शिरलं आहे. पावसामुळे शेतीचं प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक घरांची पडझड झाली आहे. या संकट काळात शेतकरी हवालदील झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरकारकडून मदतीची आस आहे. राज्यातील पूरग्रस्तांना कशाप्रकारे मदत करावी, याबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सरकारला मोलाचं आणि कळकळीचं आवाहन केलं आहे. शरद पवार यांनी ट्विट करत याबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

**शरद पवार यांच्या सरकारला ५ मोठ्या सूचना**

राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे अपरिमित नुकसान झाले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरश: कोलमडून पडली आहे. शहरी भागांनाही याची झळ पोहोचली आहे. ह्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आपत्ती निवारणाची काही महत्त्वपूर्ण कामे तातडीने हाती घ्यावीत, असे मी सुचवू इच्छितो, असं शरद पवार म्हणाले आहेत.

शरद पवार यांनी सूचवले ५ महत्त्वाची कामे

१) पंचनामा प्रक्रीयेसाठी ठरावीक मुदतीचे बंधन नसावे.

अभूतपूर्व आपत्तीमध्ये पंचनामे वेळेत उरकणे अशक्य आहे. पंचनाम्यांच्या आधारे नुकसानीचा अहवाल राज्यशासनास सादर केल्यानंतर नव्याने निदर्शनास आलेल्या नुकसानाची दखल घेतली जात नाही. उदा. अतीवृष्टीनंतर काही दिवसांनी ऊन पडल्यामुळे भिंती-छप्परांना भेगा जाऊन घरे व इतर वास्तू यांची पडझड होते. पाणी ओसरल्यानंतर पिके व पशूधन व इतर बाबींची हानी निदर्शनास येते. अशा नुकसानीचे देखील पंचनामे होऊन आपदग्रस्तांना नुकसान भरपाई मिळावी, असं शरद पवार म्हणाले आहेत.

२) नुकसान भरपाई सोबत पुनरुज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे.

वस्तुत: आपदग्रस्तांना दिली जाणारी मदत ही नुकसान भरपाई नसून अंशत: दिलासा असतो. शेतकरी व सामान्य जनता आपत्तीने कोलमडून गेली असल्याने ह्या नुकसान भरपाई सोबतच पुनरूज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यात यावा. ह्यात पिकांच्या पुनर्पेरणी व पुनर्लागवडीसाठी विशेष मदत , फळबागांच्या पुनरूज्जीवनासाठी विशेष मदत यांचा समावेश असावा, असं आवाहन शरद पवारांनी केलं आहे.



वाहून गेलेली किंवा नापीक झालेली जमीन सुधारण्यासाठी विशेष आराखडा तयार करावा. लहान-मोठे बंधारे, सिंचन कालवे, विहिरी, पंपिंग यंत्रणा व इतर सिंचन साधनांची दुरुस्ती व गाळ काढण्याची तसेच शेतकऱ्यांच्या बांध-बंदिस्तीची कामे हाती घ्यावीत. पुनर्बांधणी व पुनरूज्जीवनाची कामे मनरेगा कामांतून कशी होतील, आपदग्रस्तांच्या हातांना काम कसे मिळेल याचे देखील नियोजन करावे, असं त्यांनी सूचवलं आहे.

शाळा, आरोग्य, वीज, रस्ते व इतर पायाभूत सुविधांच्या पुनरूज्जीवनाचा आराखडा तयार करावा. पाऊस कमी झाल्यावर व पूर ओसरल्यानंतर ह्या आराखडयाची अंमलबजावणी तातडीने कशी होईल याकडे लक्ष द्यावे, असंही शरद पवारांनी सूचवलं आहे.

३) साहित्य वाटपाचा कार्यक्रम हाती घ्यावा.

अतिवृष्टी आणि पुराने नागरीकांचे संसारपयोगी साहित्य (भांडी, कपडालत्ता, फर्निचर वगैरे) नष्ट झाले आहे. शालेय साहित्य, चारा व शेतीची साधने, व्यवसायिक साहित्य यांची नासधूस झाली आहे. ह्या जंगम वस्तूंचा देखील पुरवठा करण्याचे नियोजन करावे व त्या वेळेत पुरवण्यात याव्यात, असं शरद पवारांनी सांगितलं आहे.

४) शेतकरी हिताचे निर्णय

पीक विमा योजनेतील पात्रतेचे निकष शिथील करावेत, जेणेकरून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना विमा लाभ मिळेल. खाजगी विमा कंपन्यांकडून टाळाटाळ व दिरंगाई होणार नाही, याकडे सरकारने लक्ष द्यावे. वित्तीय संस्थांकडून कर्जदार शेतकरी व व्यवसायिक यांच्याकडून होणारी वसूली तात्काळ तहकूब करावी आणि शेतकरी व व्यवसायिक यांना दिलासा देण्यासाठी संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी, असं मोठं आवाहन शरद पवारांनी केलं आहे.

५) मानसिक व सामाजिक आधार.

आपत्तीग्रस्तांना मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी समुपदेशन शिबिरे आयोजित करावीत. बाधीत व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत टोकाचे पाऊल उचलणार नाहीत, याकडे सत्वर लक्ष द्यावे. ह्या अभुतपूर्व संकटात शासकीय यंत्रणा झोकून देऊन काम करत आहे, जनतेने धीराने घ्यावे. यापूर्वीही अशा संकटांतून मार्ग काढून आपण उभे राहिलो आहोत. तसे यावेळी ही पुन्हा उभे राहू, याचा मला विश्वास आहे, असंदेखील आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं आहे.

**भातसा धरण क्षेत्रामध्ये मुसळधार पाऊस** | **धरणाचे दरवाजे तब्बल ४.५मी. उघडण्यात आले**

# भातसा नदीने धोक्याची पातळी ओलांडली; शहापूर परिसरात पूर सदृश परिस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे : भातसा धरण हे ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील एक महत्त्वाचे बहुउद्देशीय धरण असून, मुंबईला पाणीपुरवठा करण्यासोबतच वीजनिर्मिती आणि सिंचनासाठीही वापरले जाते. आज (२८ सप्टेंबर २०२५) सकाळी ६ वाजता अपडेटनुसार, धरण क्षेत्रात रात्रभर मुसळधार पाऊस पडला असून, परिस्थिती गंभीर आहे.

**पावसाची तीव्रता आणि प्रभाव:**

मुसळधार पाऊस: भातसा धरण परिसरात रात्रभर जोरदार पाऊस सुरू असल्याने भातसा नदीला पूर आला आहे. गेल्या २४ तासांत परिसरात ८५ मिमी पाऊस नोंदवला गेला आहे, ज्यामुळे नदीकाठची गावे धोक्यात आहेत.

धरणातील पाणीसाठा: धरणातील पाणीसाठा ९४.१८% पर्यंत पोहोचल्या नंतर दिवस भरात , पूर्ण क्षमतेच्या पुढे पाणीसाठा झालेला आहे (७१७,०३७ दशलक्ष लिटर क्षमता). जूनपासून आतापर्यंत एकूण २,४२४ मिमी पाऊस झाला आहे.



यामुळे धरणाचे पाचही दरवाजे आज संध्याकाळी तब्बल ४. ५मीटर ने उघडण्यात आले आहेत.

धरण पूर्ण बांधून झाल्यानंतर इतक्या वर्षात आजच प्रथमच भातसा धरणाचे दरवाजे ४. ५मी ने उघडण्यात आले आहेत. यामुळे पाण्याचा विसर्ग अतिशय मोठया प्रमाणात सुरू आहे.

**पूल आणि संपर्क तुटणे:**

शहापूर तालुक्यातील भातसा नदीवरील दोन पूल (सापगाव पूल आणि साजीवली-सावरशेत पूल) पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. यामुळे जवळपास ५० ते ६० गावांचा संपर्क तुटला असून, वाहतूक पूर्णपणे बंद आहे.

भातसा नदीकाठची गावे (जसे की सापगाव, साजीवली आणि इतर परिसरातील गावे) आणि शहापूर-मुरबाड रस्त्यावरील भागाला पूरसदृश अलर्ट जारी करण्यात आला आहे. प्रशासनाने रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलण्याचा इशारा दिला आहे. ठाणे जिल्ह्यातील नदीपात्रे (उल्हास आणि भातसा) धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहेत. परिसरात ५१ खोप्याच्या घरांचे अंशतः नुकसान आणि २१ पक्क्या घरांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील सरासरी पाऊस ९२.६० मिमी असून, शहापूरमध्ये सर्वाधिक ११५.३० मिमी पाऊस झाला आहे.

भातसा धरण मुंबईला ४८% पाणीपुरवठा करते, परंतु सध्या धरणातील वाढत्या पाण्यामुळे विसर्ग सुरू असल्याने मुंबईत काही प्रमाणात पाण्याची आवक वाढली आहे. मात्र, पूर परिस्थितीमुळे पाणीपुरवठ्यात व्यत्यय येण्याची शक्यता नाही, पण ठाणे-मुंबई महानगरपालिकेच्या धरणांमध्ये (जसे तानसा ९९.१८%, मोडकसागर १००%) एकूण ९७% पाणीसाठा आहे. प्रशासन पूर्णतः सतर्क असून, खचऊ ने कोकण विभागात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे.

## संपादकीय....

### महापूराचा फटका

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाल्याचं समोर आलं आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे. नांदेड जिल्ह्यात वीज पडून १ व्यक्तीचा मृत्यू झाला. धाराशिवमध्ये ३ जण वाहून गेले. तसेच नांदेड आणि बीडमध्ये प्रत्येकी १ अशा २ जणांचा मृत्यू झाला आहे. तर धाराशिव जिल्ह्यात ५ तर बीड जिल्ह्यात १ व्यक्ती जखमी झाली आहे. अतिवृष्टीत एकूण २१३ जनावरे मृत्यूमुखी पडली आहेत. यामध्ये धाराशिवमध्ये ८१, जालना जिल्ह्यात ४० जनावरे दगावली. दुधाळ जनावरांपैकी ९८ मोठी आणि ८६ लहान जनावरे, तर ओढकाम करणारी २५ मोठी आणि ७ लहान जनावरे दगावली आहेत. गोदावरीचे उगमस्थान असलेल्या नाशिक जिल्ह्यात दरवर्षी जोरदार पाऊस होतो. त्याच पाण्यामुळे संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात पाणीसाठा जमा होतो. मात्र, सध्या राज्यात सर्वदूर पाऊस होत आहे. त्यातच नाशिकमध्ये झालेल्या पावसाने गोदावरीला पूर आला आहे. पुढे संभाजीनगरमध्येही पाऊस सुरू झाल्यानं गोदावरीच्या पाण्यात मोठी वाढ झाली असून जायकवाडी पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे २७दरवाजे उघडण्यात आलेत. पुढे नांदेड जिल्ह्यातही पाऊस सुरू असल्यानं तिथंही गोदावरी नदी दुधडी भरून वाहत असून नदीकाठच्या गावांमधील शेतांमध्ये पाणी साचलं आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे नदी, नाले दुथडी भरुन वाहत आहेत. अनेक नद्यांना पूर आला आहे. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मुसळधार पावसामुळे गावांमध्ये पाणी शिरलं आहे. पावसामुळे शेतीचं प्रचंड नुकसान झालं आहे.

# राजा ढाले यांचे धम्म चळवळीतले योगदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारताच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात अनेक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वांनी आपला ठसा उमटवला आहे. त्यात राजा ढाले हे नाव विशेषत्वाने घेण्यात येते. कारण त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांची मशाल हातात घेतली आणि धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण केला. समाजव्यवस्थेत शतकानुशतकं पसरलेल्या जात-अन्याय, विषमता आणि अमानवीय परंपरांविरुद्ध उभं राहण्याचं साहस दाखवणाऱ्या काही थोर व्यक्तींमध्ये राजा ढाले हे नाव सदैव अग्रक्रमाने घेतलं जाईल. ते केवळ एक विचारवंत, लेखक, कवी किंवा पत्रकार नव्हते; तर ते समाजमनाला हादरे देणारे, आत्मसन्मानाची जाज्वल्य जाणीव करून देणारे आणि बाबासाहेबांच्या धम्म चळवळीचे प्रखर वाहक होते.



जातिव्यवस्था ही भारतीय समाजाच्या विकासाला लागलेली गंज आहे. या व्यवस्थेविरुद्ध बोलण्याचं धाडस प्रत्येकाला होत नाही. पण राजा ढाले यांनी आपल्या लेखणीतून आणि संघर्षातून हा आवाज बुलंद केला. राजा ढाले यांनी १९७२ मध्ये स्थापन झालेल्या दलित पँथर संघटनेच्या माध्यमातून वंचित समाजाला हक्क आणि स्वाभिमानाची नवी भाषा दिली व चळवळ उभारून त्यांनी शोषित समाजात आत्मसन्मानाची ठिणगी पेटवली. तेव्हा ते तरुण होते; पण त्यांच्यातील प्रखर अस्मिता, जाज्वल्य आत्मसन्मान आणि अढळ धैर्याने संपूर्ण समाजात जागृती निर्माण केली. बाबासाहेबांनी दिलेला संदेश की शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवला.

राजा ढाले यांना नेहमीच बाबासाहेब आंबेडकर हे प्रेरणास्थान होते. आंबेडकरांनी दाखवलेला समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा मार्ग त्यांनी आयुष्यभर आपल्या कार्यातून जपला. ढाले यांच्यासाठी बुद्धांचे धम्म म्हणजे केवळ धार्मिक आचार नव्हता, तर तो सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांचा लढा होता. राजा ढाले यांचे लेखन व भाषणांतून नेहमीच धम्म मार्गाचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यांनी बुद्धांच्या करुणा, समता आणि मैत्रीच्या तत्त्वज्ञानाला सामाजिक क्रांतीचे अधिष्ठान मानले. त्यांचा ठाम विश्वास होता की खऱ्या अर्थाने मनुष्याची मुक्ती फक्त धम्माच्या मार्गानेच शक्य आहे. म्हणूनच त्यांनी आयुष्यभर जातिभेद, अंधश्रद्धा, असमानता याविरुद्ध आवाज उठवला आणि समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचा झेंडा उंचावला.

पत्रकार, लेखक, विचारवंत म्हणून ढाले यांचे योगदान विलक्षण होते. त्यांनी सत्य मांडताना कधीही घाबरले नाही. त्यांच्या शब्दांत धार होती, त्यांच्या भूमिकेत ठामपणा होता. अन्यायाविरुद्ध उभं राहणं, अंधश्रद्धा फोडणं, आणि दुर्बलांच्या हक्कांसाठी झगडणं हेच त्यांचं जीवनकार्य ठरलं. राजा ढाले यांचे आयुष्य म्हणजे संघर्षाचा प्रवास होता. ते संघर्ष फक्त वैयक्तिक नव्हता, तर लाखो-करोडो दलित, शोषित, पीडितांसाठी होता. त्यांच्या अस्तित्वामुळे अनेकांना स्वतःच्या माणुसकीची किंमत कळली. अन्याय, अपमान, भेदभाव यांना न घाबरता लढणं म्हणजे काय, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिलं.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

ढाले यांनी धम्म चळवळीला केवळ परंपरा म्हणून न जपत, तर एक जीवंत क्रांती म्हणून पुढे नेलं. त्यांनी दाखवलं की बुद्धांचा धम्म हा फक्त पूजाघरातला विषय नाही, तर तो समाज परिवर्तनाचं अधिष्ठान आहे. धम्म चळवळ ही केवळ बौद्ध धर्माची परंपरा नाही, तर ती सामाजिक परिवर्तनाची लढाई आहे.

या लढाईला दिशा देणारे राजा ढाले होते. बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी नवी धार दिली, त्यात क्रांतिकारकता आणली. त्यांच्या कार्यामुळे धम्म चळवळीत नवा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्या विचारांनी असंख्य तरुणांना प्रेरणा दिली आणि धम्माच्या मार्गाकडे वळवलं.

आज राजा ढाले आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष आणि त्यांची ओजस्वी परंपरा आपल्याला सतत मार्गदर्शक ठरेल. धम्म चळवळीतला त्यांचा ठसा कायमचा अविस्मरणीय आहे. त्यांनी दाखवलेला आत्मसन्मानाचा मार्ग आणि बाबासाहेबांच्या तत्त्वांचा वारसा पुढे नेणं हीच खरी त्यांना दिलेली श्रद्धांजली ठरेल. समता, न्याय आणि धम्माचा संदेश जगभर पोहोचवणाऱ्या थोर विचारवंत राजा ढाले यांना वाढदिवसानिमीत्त मानाचा मुजरा!

# राज्यातील पत्रकारांना मारहाण करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी

मुंबई -पत्रकार राजेंद्र साळस्कर महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांचे पत्रकार व वृत्त छायाचित्रकार तसेच चित्रवाहिनीचे रिपोर्टर व कॅमेरामन यांना आपले कर्तव्य पार पाडीत असताना त्यांना राजकीय पुढारी व त्यांचे हस्तक तसेच गुंडप्रवृत्तीच्या लोकांपासून होणाऱ्या त्रासांचा सामना करावा लागत असतो.प्रसंगी मारहाणीलाही सामोरे जावे लागत असते.केवळ पत्रकार म्हणूनच नव्हे तर सामान्य माणूस म्हणून त्यांना असणाऱ्या मानवी अधिकारांची अशा प्रवृत्तींकडून पायमल्ली होत असते.अशा मानवी अधिकारांचे हनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रने मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष तसेच निवृत्त. न्यायाधीश मा.एम.बदर यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

८ डिसेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र सरकारने पत्रकार संरक्षण कायदा संमत केला व पत्रकारासाठी अशाप्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र सरकार हे पहिले राज्य असल्याचे सांगत आपले ढोल बडवून घेतले. परंतु या कायद्याची अंमल बजावणी करण्यात यावी असे नोटीफिकेशन सरकारने न काढल्यामुळे पत्रकारावर हल्ले करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही परिणामी हल्लेखोर मोकाट सुटतात.यामुळे

**मानवाधिकार आयोगाकडे जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रने केली लेखी तक्रार**

समाजात अशाप्रकारची प्रवृत्ती दिवसेदिवस बळावू लागली आहे.अशा प्रवृत्तींना आळा घालून मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे यासाठी अशा लोकांवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रचे महाराष्ट्र अध्यक्ष नारायण पांचाळ व महाराष्ट्र संघटन सचिव राजेंद्र साळसकर यांनी मानवी अधिकार आयोगाचे अध्यक्ष एम.बदर यांच्याकडे लेखी तक्रारी केली असून दोषींवर कारवाई करून हल्ला झालेल्या पत्रकारांसाठी न्यायाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पत्रकार, छायाचित्रकार व विशेषत: चित्रवाहिनीचे रिपोर्टर आणि कॅमेरामन यांच्यावरील हल्ल्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहेत.



६ सप्टेंबर रोजी साम टिव्हीचे पत्रकार विकास मिरगणे हे गणपती विसर्जनाचे वार्तांकन करण्यासाठी गिरगाव चौपाटी येथे आपल्या टीमसह गेले असता गाडी पार्क करण्याच्या क्षुल्लकशा कारणावरून एपीआय श्री.शांताराम नाईक या पोलीस अधिकाऱ्याने पत्रकार मिरगणे यांच्या कानशिलात लगावली. एपीआय शांताराम नाईक यांनी कोणत्या अधिकाराने पत्रकार मिरगणे यांच्या कानशिलात लगावली.मिरगणे यांनी गाडी चुकीच्या जागी पार्क केली असल्यास जो काही कायदेशीर दंड आहे तो ते न आकारता पत्रकाराला मारहाण करणे कोणत्या कायद्यात बसते.याबाबत जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्रने, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस व मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्याकडे लेखी तक्रार केली असून यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही.

त्याचबरोबर २० सप्टेंबर रोजी त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजनासंबंधी साधु-महंतांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी नाशिक येथून त्र्यंबकेश्वर येथे काही पत्रकार गेले होते.त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना टोल भरावे लागत असते.परंतु आपण पत्रकार आहोत आणि साधु-महंतांच्या बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी आलो आहोत असे सतत सांगूनही या टोल नाक्यावरील वसुली कर्मचारी काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हते. हे पत्रकार वरिष्ठांना फोन करीत असतानाच टोल वसुली करणाऱ्या गुंडप्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांनी या पत्रकारांना गाडीच्या बाहेर ओढून , दगड, लाठ्या व लोखंडी रॉडने मारहाण करावयास सुरूवात केली.

या हल्ल्यात झी२४ चे योगेश खरे व पुढारी न्यूजचे किरण ताजणे, अभिजित सोनावणे आणि अन्य दोन पत्रकार यात जखमी झाले असून यातील पुढारी न्यूजचे पत्रकार किरण ताजणे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर तेथील अपोलो रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी कारवाई चे आदेश दिले असून याप्रकरणी चौघांना अटक झाली आहे.या गुन्ह्यात दोषींना अटक झाली असली तरी पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीचे २०१९ पासून नोटिफिकेशन निघालेले नसल्यामुळे दोषी व्यक्ती कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन काही दिवसात मोकाट सुटतील.

तेव्हा या दोन्ही गुन्ह्यातील दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी जेयुएमचे महाराष्ट्र अध्यक्ष नारायण पांचाळ व महाराष्ट्र संघटन सचिव राजेंद्र साळसकर यांनी मानवी अधिकार आयोगाचे अध्यक्ष एम. बदर यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

## सोनम वांगच्छुक यांच्या अटकेचा भीमशक्ती संघटनेकडून निषेध

सोलापूर/प्रतिनिधी

लेह अपेक्स बॉडी व. कारगिल डेमोक्रटीक आलायन्स. चे. नेते सोनम वांगच्छुक यांच्यावर देशद्रोहीचा (छड) आरोप. लावून त्यांना अटक करून राजस्थान. येथील जोधपूर जेल याठिकाणी ठेवण्यात आले आहे या भ्याड कृती करण्याऱ्या. केंद्र सरकातचा. भीम शक्ती सामाजिक संघटनेच्या. वतीने तीव्र निषेध. करीत असून सोनम वांगच्छुक. यांनी भारत देशासाठी. अनेक मोठमोठे पारितोषिक मिळविले शिक्षणच्या प्रगतीचा खूप. मोठा. आधार असून वेग वेगळे शोध निर्मितीचा. कणा आहे त्यांनी लडाक. सारख्या ठिकाणी. थंडी पासून लष्करांचा त्रास. किंवा बचवासाठी सोलर निरीमत. तंबू. निर्माण केले असे अनेक प्रकारचे. देशाभिमान. कार्य केले. ते गेल्या. काही दिवसापासून लडाक प्रांतला राज्याचा दर्जया मिळावा तसेच. तेथील युवकांना. रोजगार मिळावा तसेच. सीमेलगत असलेली. भारत देशाची जमिनीवर चीन अतिक्रण. करत आहे. ते रोखण्याचा प्रयन्त. केंद्र सरकाने करावा या मागणी साठी. सोनम वांगचूक. हे लोकशाही. मार्गाने. आंदोलन. करीत असताना. सुद्धा त्यांना. अटक केली पाकिस्तान नेपाळ बंगला देशाचे. ते हस्तकं आहेत असा. आरोप लावण्यात आले असून ते आरोप सारासार. खोटे आहेत केवळ चीन नकेलेले. अतिक्रमन. लोकांच्या. समोर येऊ नये. तसेच. तेथील. खनिज. सपती असलेली जमिन ही आडाणीच्या घास्यात घालवायची असल्या कारणामुळे सोनम वांगचूक यांना. अटक. करण्यात आल्याचे पत्रक. भीम शक्ती सामाजिक संघटनेचे सुबोध वाघमोडे राजाभाऊ कफम उमेश सुरते मनोज लोंढे सौ तुलोंढे ज्योती गायकवाड मेजर. साबळे सलीम. मुल्ला. यांनी काढले. आहे

# अक्कलकोटचा अभिमान : पद्मभूषण डॉ. सुधा मूर्ती यांचा थेट दूरध्वनीवरून धानय्या कौटगीमठ यांना अभिष्टचिंतन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : जगप्रसिद्ध लेखिका, राज्यसभा सदस्य, पद्मश्री व पद्मभूषण पुरस्काराने गौरविलेल्या थोर शिक्षणतज्ज्ञ, समाजसेविका, दानशूर व्यक्तिमत्त्व व इन्फोसिस फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुधा मूर्ती यांनी आज सकाळी ९.३० वाजता अक्कलकोट येथील के.एल.ई. मंगरुळे हायस्कूलचे शिक्षक डॉ. धानय्य गुरुलिंगय्या कौटगीमठ यांना थेट दूरध्वनीवरून संपर्क साधून तब्बल १३ मिनिटांचा संवाद साधला. यावेळी त्यांनी कौटगीमठ यांचे पीएच.डी. पदवी संपादनाबद्दल हार्दिक अभिनंदन केले.


डॉ. कौटगीमठ यांनी नुकतेच डॉ.

**शिक्षण शिकतच रहा, समाजासाठी त्याचा उपयोग करा असे मी मनापासून आशीर्वाद देते**
**– डॉ. सुधा मूर्ती**
**(पद्म भूषण साहित्यिक)**

सुधा मूर्ती यांचे साहित्यविश्व : एक अन्वेषण या विषयावर सविस्तर प्रबंध सादर करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. या संशोधनासाठी त्यांनी तब्बल अकरा वर्षे मनःपूर्वक श्रम घेतले. ही माहिती समजताच स्वतः डॉ. सुधा मूर्ती यांनी फोन करून कौटगीमठ यांना विविध सखोल प्रश्न विचारले.

त्यांनी विचारलेल्या प्रश्नांत - माझेच साहित्य संशोधनासाठी का निवडले? उद्दिष्ट काय होते? कोणत्या घटनांनी प्रेरित केले? शाळेच्या जबाबदाऱ्यांसह संशोधन कसे साध्य झाले? अशा मुद्द्यांचा समावेश होता. याशिवाय महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कोणत्या कथा अभ्यासक्रमात घेतल्या आहेत, कर्नाटक-महाराष्ट्र सीमाभागातील शिक्षणव्यवस्था, कन्नड- मराठी भाषांचे संबंध, स्थानिक लोककला व संस्कृती, तसेच के.एल.ई. संस्थेचे शैक्षणिक कार्य यांविषयीही त्यांनी रस घेतला.

या प्रसंगी डॉ. मूर्ती यांनी शाळेचे मुख्याध्यापक श्री. नंदाजी कदम यांच्याशीही संवाद साधून शाळेची शैक्षणिक कामगिरी व विद्यार्थ्यांची संख्या जाणून घेतली. त्यांनी कौटगीमठ यांच्या साधेपणा, नम्रता, अभ्यासू वृत्ती, समाजाभिमुखता तसेच छएढ/डएढ परीक्षा तब्बल ७९ वेळा उत्तीर्ण होऊन केलेल्या जागतिक विक्रमाचे आणि आता पर्यंत यू ट्यूब चॅनेल मार्फत सेट नेट टी इ टी





परीक्षा संदर्भात मोफत मार्गदर्शन कन्नड , मराठी, इंग्रजी भाषेत करीत आहेत

**मला डॉ सुधा मूर्ती यांच्या साहित्या वर पी एच डी पदवी मिळाले त्या आनंदा पेक्षा मला जास्त आनंद आज पद्म भूषण पुरस्कार विजेते साहित्यिक डॉ सुधा मूर्ती मॅडम यांच्या सोबत संवाद केलो आणि आशीर्वाद मिळाले .हा क्षण माझ्या साठी अतिशय आनंद आणि अभिमानाचा सुवर्ण क्षण .**
**– डॉ धानय्या कौटगीमठ**
**सह शिक्षक, के एल ई मंगरूळे हायस्कूल अक्कलकोट**

आणि आता पर्यंत १०५२ विद्यार्थी सेट नेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत यांची ही कौतुक केले.

डॉ. मूर्ती यांनी त्यांच्या कथा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. तसेच कौटगीमठ यांच्या पीएच.डी. प्रबंधाचे लवकरच पुस्तक स्वरूपात प्रकाशन व्हावे यासाठी त्यांनी सहमती दर्शविली आणि निकट भविष्यात बेंगळुरू येथे प्रत्यक्ष भेटण्याचे आश्वासनही दिले.

या संशोधनप्रवासात डॉ. टी. एन. कोळेकर (दयानंद कॉलेज, सोलापूर) यांचे मार्गदर्शन आणि डॉ. शिवाजी शिंदे (सहायक कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ) यांचे अमूल्य सहकार्य लाभले. शाळेत दूरध्वनी आल्यानंतर श्री. सचिन डफळे व श्री. मधु धुळगोंड यांनी कौटगीमठ यांना तांत्रिक मदत केली.

या अभिमानास्पद प्रसंगानंतर मुख्याध्यापक श्री. नंदाजी कदम, उपमुख्याध्यापक श्री. जी.बी. पट्टेद, पर्यवेक्षिका सौ. आरती तोळणूरे, सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग यांनी डॉ. धानय्या कौटगीमठ यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांचा गौरव केला.

ही घटना केवळ अभिनंदनापुरती मर्यादित नसून, ज्ञान, साधेपणा आणि साहित्याच्या सामर्थ्याने शिक्षक-विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी एक ऐतिहासिक क्षण ठरली आहे.

# वंचित बहुजन आघाडीकडून वरदडी पंचायत समिती लढण्यास इच्छुक

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी



वरदडी पंचायत समिती गणातील येणारी निवडणूक यंदा अत्यंत रंगतदार होणार असल्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. सामाजिक कार्यातून आपली वेगळी ओळख निर्माण केलेले, तरुणांमध्ये लोकप्रिय असलेले अनिल रंधवे हे या निवडणुकीत प्रमुख दावेदार म्हणून पुढे येत असून, त्यांच्या उमेदवारीकडे गावोगाव उत्सुकतेने पाहिले जात आहे. सध्याच्या लोकप्रतिनिधींवर नाराजीसध्याच्या लोकप्रतिनिधींनी युवकांच्या प्रश्नांकडे दाखवलेली उदासीनता, रोजगार व शिक्षणाच्या संधींकडे केलेले दुर्लक्ष, तसेच विकासकामातील ठप्पपणा यामुळे जनतेमध्ये नाराजीचा सूर आहे. ग्रामीण भागातील युवक, शेतकरी आणि महिलांमध्ये बदलाची अपेक्षा वाढली असून, ही नाराजी अनिल रंधवे यांच्या जमेची बाजू ठरत आहे.रंधवे यांचा जनसंपर्क व जमेच्या बाजू

**वरदडी पंचायत समिती गणात नवा उत्साह; अनिल रंधवे यांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष**

रंधवे यांचा साधेपणा, जमीनीवरील संपर्क आणि कार्यकर्त्यांशी असलेले थेट नाते यामुळे त्यांना स्थानिकांमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांनी शैक्षणिक सुविधा, क्रीडा साधने, महिलांचे सबलीकरण आणि ग्रामीण भागातील रोजगार या मुद्यांवर काम करून दाखवले आहे. त्यामुळे ते युवकांचे प्रतिनिधित्व करणारा चेहरा म्हणून उभे राहिले आहेत.गावोगाव चर्चा - समीकरण बदलणार गावोगावात सुरू असलेल्या चर्चांनुसार यावेळी वरदडी पंचायत समिती गणात नक्कीच धक्का बसणार असल्याची जोरदार चर्चा रंगत आहे. अनिल रंधवे यांची उमेदवारी जाहीर होताच स्थानिक राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होणार, याबाबत राजकीय वर्तुळातही ठाम मत व्यक्त केले जात आहे.पक्षाची उत्सुकता

अनिल रंधवे यांनी निवडणूक कोणत्या पक्षाकडून लढवायची याबाबत अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे ते कोणत्या पक्षाचे उमेदवार म्हणून रिंगणात उतरणार याबाबतही उत्सुकता आहे. यामुळे राजकीय समीकरण अधिकच रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. विरोधकांपुढे आव्हान

विरोधकांकडे ठोस अजेंडा नसल्याची चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर, सध्याच्या प्रतिनिधींवर नाराजी आणि रंधवे यांच्या उमेदीमुळे निवडणुकीत पारंपरिक समीकरणे कोलमडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर यावेळी वरदडी पंचायत समिती गणात नक्कीच धक्का बसणार, अशी गावोगावांमध्ये कुजबुज आहे.

निष्कर्ष अनिल रंधवे यांच्या उमेदवारीला मिळत असलेला उत्साह, युवकांचा मोठा पाठिंबा आणि जनतेतील बदलाची मागणी या सर्वांचा विचार करता, यंदा वरदडी पंचायत समिती गणातील निवडणूक ही केवळ नियमित लढत न राहता परिवर्तनाची लढत ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्ह्यातील सहकारी, खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांनी पूरग्रस्त बाधित नागरिकांसाठी शक्य तेवढी मदत द्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पूरग्रस्तांना मदत देण्याच्या अनुषंगाने बँकांचे प्रतिनिधी समवेत आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व आलेल्या पुरामुळे सात तालुक्यातील ९२ गावे बाधित झालेल्या असून हजारो कुटुंब बाधित झालेली आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने या सर्व कुटुंबांना जेवण, पाणी, आरोग्य तसेच जनावरांसाठी चारा अशा प्रकारची मदत तात्काळ सुरू केलेली आहे. परंतु अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नागरिकांची घरांचे, शेती पिकांचे व जनावरांचे नुकसान झालेले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी बँका, खाजगी बँका तसेच राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांना जेवढी शक्य असेल ती मदत बाधित नागरिकांसाठी द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.




जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पूरग्रस्त बाधित नागरिकांना मदत देण्याच्या अनुषंगाने सर्व सहकारी बँकेचे चेअरमन, मुख्याधिकारी तसेच खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांचे जिल्हा प्रतिनिधी यांच्या समवेत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे, जिल्हा सहकारी उपनिबंधक किरण गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, रोहयो उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह सर्व सहकारी खाजगी व राष्ट्रीयीकृत बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, ज्या बँकांना आर्थिक स्वरूपात मदत करायची आहे, त्यांनी आर्थिक स्वरूपात मदत करावी. तसेच ज्या बँकांना जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य किटच्या रूपात मदत उपलब्ध करून द्यायचे असेल त्यांनी जिल्हास्तरीय किंवा तालुकास्तरीय मदत कक्षाकडे आपली मदत पाठवावी. पूरग्रस्तांना मदत देण्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नाही. त्यामुळे सर्व बँकांनी सढळ हाताने मदत देऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील नुकसानग्रस्त व पुरग्रस्तांच्या सार्वजनिक हितासाठी नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध व्हाव्यांत या उद्देशाने मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला असून, मदत कक्षामार्फत आवश्यक ती मदत करुन बाधित नागरिकांचे प्रश्न तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागांशी संपर्क साधून सोडविण्यात येतील. या मदत कक्षाच्या माध्यमातून ९२ बाधित गावांपैकी कोणत्या गावाला कोणत्या प्रकारची मदतीची आवश्यकता आहे याची माहिती दिली जाणार आहे त्यामुळे गरजू बाधितग्रस्तांना केलेली मदत तात्काळ देणे सोयीचे होणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित सर्व सहकारी बँका खाजगी बँका व राष्ट्रीयकृत बँकांच्या प्रतिनिधी यांनी पूरग्रस्त बाधित नागरिक व गावांना मदत देण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. सहकारी बँकांसाठी जिल्हा उपाधिबंधक किरण गायकवाड तर खाजगी व राष्ट्रीयकृत बँकांसाठी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखर्डे हे समन्वयकाची भूमिका बजावणार आहेत.

**जिल्हास्तरीय मदत कक्ष अधिकारी व संपर्क क्रमांक :-**

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला असून जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार श्री. सैपन नदाफ मोबाईल क्रमांक ८३७९९ ८१७९९ तर दूरध्वनी क्रमांक ०२१७-२९९०१४० यावर संपर्क साधावा.

**तालुकास्तरीय मदत कक्षाचे अधिकारी व संपर्क क्रमांक:-**

उत्तर सोलापूर तालुक्यात श्री सुधाकर बंडगर, निवडणूक नायब तहसिलदार, मोबाईल क्रमांक ९८८१७४१३११, कार्यालयीन क्रमांक ०२१७-२७३१०१४; माढा तालुक्यात श्री प्रितम पवार, पुरवठा निरीक्षक, मोबाईल क्रमांक ९९७०८२७५७४, कार्यालयीन क्रमांक ०२१८३-२३४०३१; करमाळा तालुक्यात श्री शतुघ्न चव्हाण, पुरवठा निरीक्षक, मोबाईल क्रमांक ८८०५९०७६८६, कार्यालयीन क्रमांक ०२१८२-२२०५३५; बार्शी तालुक्यात श्री संतोष गुलाब शिंदे, पुरवठा निरीक्षक, मोबाईल क्रमांक ९५१८५६२५३२, कार्यालयीन क्रमांक ०२१८४-२२२२१३; अपर तहसिल मंद्रुप येथे श्री नवल सरवळे, सहा. महसूल अधिकारी, मोबाईल क्रमांक ९३०९५९७३६८; दक्षिण सोलापूर तालुक्यात श्री विनायक कुलकर्णी, निवडणूक नायब तहसिलदार, मोबाईल क्रमांक ९४२३३३१६५७, कार्यालयीन क्रमांक ०२१७-२७३१०३३; तर मोहोळ तालुक्यात श्रीमती सोनाली निटुरे, पुरवठा निरीक्षण अधिकारी, मोबाईल क्रमांक ९०२२००८६८१, कार्यालयीन क्रमांक ०२१८९-२३२२३४. नागरिकांनी पूरग्रस्त मदतीसाठी संबंधित तालुक्याच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

या किट मध्ये खालील वस्तूंचा समावेश असावा.

ज्वारीचे पीठ, आटा, हरभरा दाळ, स्वयंपाक तेल, मीठ, तिखट मसाला, हळद, दूध पावडर, मेणबत्ती पाकीट मध्यम आकाराचे, मच्छर आगरबत्ती, काडीपेटी, टॉर्च विथ बॅटरी, इमरजन्सी लाईट,अंगाचे साबण, प्लास्टीक ताडपत्री, चादर, सतरंजी तसेच पातेला, तवा, ताट, तांबे, वाटी, चमचा, ग्लास, उलतन, पक्कड/सांडशी, पळी (आमटी वाढण्यासाठी), प्लास्टीक बकेट अशा आवश्यक मूलभूत वस्तूंचा समावेश आहे. परंतु ज्यांना मदत द्यायची आहे त्यांनी या वस्तू व्यतिरिक्तही मदत देऊ शकतात.




# स्वेरीत सिव्हिल इंजिनिअरिंगच्या 'सेसा'चे उद्घाटन व मॉडेल प्रदर्शन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने 'सेसा' अर्थात 'सिव्हिल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन' चे उदघाटन दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांकडून सिव्हिल इंजिनिअरिंग संबंधित बनवण्यात आलेल्या विविध संशोधनात्मक व नाविन्यपूर्ण मॉडेल्सचे प्रदर्शन देखील भरविण्यात आले होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांची कल्पकता व समज अधिक प्रगल्भ असल्याचे दिसून आले.

प्रारंभी विद्यार्थिनी साक्षी घाडगे यांनी 'सेसा' संबंधित सर्व उपक्रमांची संपूर्ण माहिती दिली. 'सेसा' च्या उदघाटन प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून नगररचना विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी के. आर. जोशी यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानासोबतच सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी बहुमोल मार्गदर्शन केले. उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक, तांत्रिक व सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सेसाचे विद्यार्थी पदाधिकारी अध्यक्ष पी. पी. पाटील व उपाध्यक्ष ओंकार काकडे यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यात विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध मॉडेल्सच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्मार्ट ट्राफिक मॅनेजमेंट, स्मार्ट ब्रीज, स्मार्ट सिटी, विविध प्रकारच्या धरण प्रतिकृती आदी सिव्हील संबंधित मॉडेल्स अधिक लक्ष वेधून घेत होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण मॉडेल्सना विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग व उपस्थित मान्यवरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विभागप्रमुख डॉ. पी. आर. बामणे यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापकांच्या सहकार्याने हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. एम. व्ही. डोंगरे यांनी काम पाहिले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, यांच्यासह प्राध्यापक वर्ग, विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थिनी साक्षी घाडगे व खुशी शर्मा यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# मेहकरात वेगळा विदर्भासाठी नागपूरकरांची होळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : विदर्भाला महाराष्टात सामील करतांना २८ सष्टेबर १९५६ रोजी नागपूर करार करण्यात आला होता. त्या कराराची कोणती ही अंमल बजावणी महाराष्ट सरकारने केली नाही त्यामूळे विदर्भाच्या सर्वच क्षेत्रातला अनूशेष वाढत गेला.

त्यामूळे वेगळ्या विदर्भाची मागणी जोर धरत गेली. त्यामूळेनागपूर कराराची होळी करण्याचा इशारा विदर्भ आंदोलन समीतीने दिला त्यानूसार आज दिनांक २८ सप्टेबर २०२५ रोजी मेहकर येथील जिजाऊ चौकात विदर्भ आंदोलन समीतीचे विदर्भ ऊपाध्यक्ष मा ॲड सुरेश वानखेडे यांच्या नेतृत्वात नागपूर कराराची होळी करण्यात आली. यावेळी विदर्भ आंदोलन समीतीचे सोपाणदादा देबाजे,भाई कैलास सुखधाने, राधेशामजी भराडे, दादासाहेब गवई, प्रा डि एस वाघ, बी बी चौधरी,प्रा विश्वनाथ बाहेकर, प्रल्हादराव रहाटे, ॲड विनोद नरवाडे, संदिपभाऊ



गवई, रमेशराव गवई, पंडीतराव देशमूख,आश्रु मानवतकर आदि असंख्य कार्यकर्ते ,पदाधिकारी ऊपस्थित होते.या वेळी वेगळा विदर्भ झालाच पाहिजे, अशा गगणभेदी घोषनांनी परिसर दनाणून सोडला. व नागपूर कराराची होळी करण्यात आली.

# सोनम वांगचुक यांच्या संघर्षाला पाठिंबा : ॲड. प्रकाश आंबेडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लडाखला राज्याचा दर्जा व सहाव्या अनुसूचीतील समावेशन या दोन महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी ठाम पाठिंबा दर्शवला आहे. प्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली लडाखमधील जनता गेल्या काही महिन्यांपासून या मागण्यांसाठी संघर्ष करत आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, लडाखच्या जनतेचा संघर्ष न्याय्य असून तो केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित नाही. हा देशाच्या लोकशाही मूल्यांचा, संवैधानिक अधिकारांचा आणि पर्यावरणीय समतोलाचा प्रश्न आहे. लडाखला आजवर प्रशासकीय दुर्लक्षाचा सामना करावा लागला आहे. तेथील लोकांच्या आवाजाकडे सतत दुर्लक्ष झाले आहे आणि या दुर्लक्षामुळे लडाखचे अद्वितीय व नाजूक वातावरण असुरक्षित राहिले आहे. अशा परिस्थितीत आम्ही सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला पाठिंबा देतो.

लडाखला २०१९ साली केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाल्यानंतर स्थानिक लोकांनी अनेकदा राज्याच्या दर्जाची मागणी केली आहे. याशिवाय सहाव्या अनुसूचीतील तरतुदी लडाखसाठी लागू झाल्यास तेथील स्थानिक जनतेच्या हक्कांचे व सांस्कृतिक ओळखीचे संरक्षण होईल, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.

पर्यावरणीय दृष्टीने लडाख हा हिमालयीन पट्ट्यातील अत्यंत संवेदनशील प्रदेश आहे. हवामान बदल आणि अनियंत्रित पर्यटनामुळे येथील परिसंस्था मोठ्या प्रमाणावर धोक्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिकांना निर्णय प्रक्रियेत अधिक अधिकार मिळावेत, ही मागणी आणखी महत्त्वाची ठरते. ड. प्रकाश आंबेडकर यांनी केलेले समर्थन हे लडाखच्या आंदोलनाला राष्ट्रीय स्तरावर बळकटी देणारे मानले जात आहे.

**शेतकऱ्यांच्या पिकांसह पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान**

**जनजीवन ठप्प, सरसकट पंचनामे करण्याची मागणी**

# अतिवृष्टीमुळे नळदुर्ग बोरी नदीला महापूर; दहिटणा येथील शेतकऱ्याच्या दोन म्हशी पुरात वाहून गेल्या तर एका म्हशीचा वीज पडून जागेवर मृत्यू



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड: तुळजापूर तालुक्यातील (जिल्हा धाराशिव) नळदुर्ग,वागदरी, दहिटणा व परिसरात सतत संततधार पावसाने मोठ्या प्रमाणात धिंगाणा घातला असून अतिवृष्टीमुळे नळदुर्ग बोरी नदीला महापूर येऊन दहिटणा तालुका तुळजापूर येथील एका 'शेतकऱ्याच्या दोन म्हशी पुरात वाहून गेल्या तर एक म्हैस वीज पडून जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडलेली असून या परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

याबाबत माहिती असी की परतीच्या पावसाने गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी होऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.दोन-तीन दिवस पावसाने उघडीप दिल्याने नुकतच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व एकनाथ शिंदे त्याचप्रमाणे रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, शिव सेना ( उबाठा ) चे प्रमुख माजी मुख्यमंत्री नामदार उद्धव ठाकरे सह अन्य मंत्र्यांनी सोलापूर,धाराशिव जिल्ह्यासह मराठवाड्याचा पाहणी दौरा आटोपून ते परत जातात न जातात तो पर्यंत दोनच दिवसात दिनांक २७ सप्टेंबर २२५ पहाटे तीनच्या सुमारास पावसाने अचानकपणे मोठ्या प्रमाणात हाजेरी लावून पूर्ववत उग्ररूप धारण केले सतत संतत धार पावसामुळे परत एकदा तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग बोरी नदीला महापूर आला येथील बोरीधरण, खंडाळा प्रकल्पा सह व छोटी मोठी सर्व साठवन तलाव भरून मोठ्या प्रमाणान अतिरिक्ता पाणी सांडव्या वाटे बाहेर पडल्याने बोरी नदी, खंडाळा नदी नाले ओसांडून वाहू लागले यामुळे सर्वच मार्गावरून येणारे पाणी बोरी नदीच्या पुरात मिसळून एक मोठा महापूर तयार झाला या बोरी नदीच्या महापुराने पुनश्च एकदा नदीकाठच्या शेतकऱ्याचे शेतातील खरीप हंगामातील सोयाबिन सह अन्य पिके माती सगट वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे.

या महापुरामध्ये दहिटणा ता.तुळजापूर येथील आप्पासाहेब बिराजदार यांच्या नदीकाठी असलेल्या दोन म्हशी महापुरामध्ये वाहून गेल्या तर एका म्हशीवर वीज पडून ती जागीच मृत्यु पावली असून आप्पासाहेब बिरादार यांच्या शेतातील घरात पाणी शिरून अन्नधान्य संसार उपयोगी वस्तूचे मोठे नुकसान झाले आहे. या दुर्दैवी घटनेची माहीती मिळताच तुळजापूर विधान सभेचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिवच्या अप्पर जिल्हकारी ज्योती पाटील,तुळजापूर तहसिलचे तहसिलदार आरविंद बोळंगे, नळदुर्ग अप्पर तहसिल कार्यालयाचे तहसीलदार प्रविण गायकवाड, मंडळ आभिकारी पवन कोकरे, अमर गांधिले, तलाठी महादेव गायकवाड, आकांक्षा वाघमारे, सहाय्यक कृषी आधिकारी यू.टी.कार्ले, आदी प्रशासनातील आधिकारी व कर्मचारी यानी दहिटणा येथिल नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व भयभीत झालेल्या ग्रामस्थांना भेटण्यासाठी थेट दहिटणा गावाला खेटून जाणाऱ्या बोरी नदीच्या काठावर जावून भेट देवून चौकशी करून ग्रामस्थाना मानसिक आधार दिला. या प्रसंगी नुकसानग्रस्थ शेतकरी व ग्रामस्थासी बोलताना अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील म्हणाल्या की, पाऊस थांबल्या नंतर लवकरात लवकर सर्व शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून नुकसानग्रस्थाना शासनाकडून अर्थसहाय्य करण्याचा प्रयत्न केला जाईल. बोरीनदीच्या पलिकडे असलेल्या शेतकऱ्याना गावातून शेताकडे जाण्या येण्यासाठी बोरी नदीवर अक्कलकोट तालुक्यातील तुळजापूर अक्कलकोट सिमा रेषेवर वसलेल्या काजीकणबस कडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्याला जोडणारा पूल बांधण्याची गरज असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

यावेळी भाजपाचे सिद्धू अण्णा कोरे भिवा इंगोले,विलास, अँड. अशिष सोनटक्के,महादेव सालगे,कल्याण बिराजदार,किशोर धुमाळ,प्रमोद सोमोसे,अनिल पवार,आरपीआय (आठवले)चे एस.के.गायकवाड सह शेतकरी ग्रामस्था उपस्थित होते.

# भातसा नदीवरील वालकस पूल पाण्याखाली परिसरातील हजारो नागरिकांचा संपर्क तुटला






## भात शेतीचे मोठे नुकसान; जनजीवन विस्कळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आधीच पुरामुळे त्रस्त असलेल्या मराठवाड्यासाठी हा इशारा चिंतेचा विषय ठरत असताना ठाणे जिल्ह्यात मुसळधार पावसाने २४ तासांपासून धुमाकूळ घातलं असून ठाणे जिल्ह्यातील अनेक नद्या ओढ्याना पूर आला आहे. तर ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक गावपाड्यांना जोडणारे पूल पाण्याखाली गेल्याने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर हवामान विभागाने ठाणे जिल्हात 'रेड अलर्ट' जाहीर करण्यात आला आहे.

भिवंडी तालुक्यास जोडणारा भातसा नदीवरील तर कल्याण तालुक्यातील वालकस पूल पाण्याखाली गेल्याने वालकस,बेहरे या गावातील हजारो नागरिकांचा शहराशी संपर्क तुटला आहे. भातसा धरण विसर्ग सूचना पत्राचे अनुषंगाने, भातसा धरणांमधून भातसा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात आला असून ,भातसा नदीकाठावरील इतर गावांतील सरपंच, तलाठी, ग्रामसेवक यांना व गावातील नागरीकांना नदीच्या पाण्याच्या पातळी वाढ होण्या बाबतच्या सुचना आपले स्तरावर देण्यात आल्या आहेत, तसेच पुढील काळात कोणीही वाहत्या पाण्यात प्रवेश न करण्याबाबत दक्षता घेण्याच्याही सुचना देण्यात आल्या आहेत.

मुसळधार पावसामुळे भातसा नदीपात्राच्या पूर प्रवण क्षेत्रातील वांद्रे, सौर,कळंबोली, कोशिंबी, आतकोळी( मुरबी पाडा) भाद-णे (जुपाडा, बाटलीपाडा), चिराडपाडा (आदिवासी वाडी) वांद्रे (आदिवासी वाडी), कांदळी, खडवली नदी जवळील परिसरातील मातोश्री वृद्धाश्रम परिसरात पाणी शिरले आहे. शेतघर असलेल्या ठिकाणी तसेच नदी परिसरातील घरांमध्ये पाणी शिरले असून, तेथील नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आलेले आहे.

सदर ठिकाणी मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी, पोलिस, सरपंच ,पोलिस पाटील, आशा सेविका, आरोग्य विभागाची टीम, युवक मंडळ यांनी बचाव कार्यास सहकार्य केले. तर खडवली पूल पाण्याखाली गेल्याने व रेल्वे सेवा ठप्प झाल्याने पावसाच्या काळात नागरीकांना उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी जायचे कसे? हा मोठा संकट परिसरातील नागरिकांच्या समोर उभा राहीला आहे.

पावसामुळे अनेक ठिकाणी भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर शेतकरी अडचणीत आले आहेत. तर पडघा पोलीस स्टेशनच्या माध्यमातून खडवली, वालकस, कुंभेरी नदी,गांधारी ब्रिज, येथे पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मुसळधार पा-वसामूळे जिल्ह्यातील सर्वच शहरातील सखल भागात पाणी साचल्याने शेकडो नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले आहे.

मुसलधार पावसामुळे शहरी भागासह ग्रामीण भागातील बहुतांश सखल भाग जलमय झाल्याने हजारो नागरिकांच्या दुकानासह घरातील संसरा उपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे.

भिवंडी शहर, ग्रामीण भागातही पावसामुळे हाहाकार उडाला आहे. जिल्ह्यात सर्वच नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून नदी खाडी, ओढे या लगतच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचे इशारा जिल्हा प्रशासनकडून देण्यात आला आहे. तरी या कालावधीत सर्व विभागांनी दक्ष राहून तसेच एकमेकांशी समन्वय साधून काम करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आ-पत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने यांनी केले आहे.

---

नवरात्र महोत्सव : सातवी माळ

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री महालक्ष्मी माता पोशाखसह अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर /प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात झाली आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे सातव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस महालक्ष्मी पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.









श्री विठ्ठलास (मस्य अवतार) सोने मुकुट, नाम हिऱ्याचा, कौस्तुभ मनी, हिऱ्याचा कंगण जोड, दंड्पेटया, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच मोठा, तोडे जोडे, मारवाडी पेट्या मोत्याचा हार, पैंजण जोड, नवरत्नाचा हार, चांद मस्त्य इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत. तसेच रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, मस्य जोड, सूर्य सोन्या मोत्याचे तानवड जोड, मोठी नथ, कर्ण फुले जोड, चिंचपेटी हिरवी, मन्यामोत्याच्या पाटल्या जोड, जवेची माल २ पदरी, कोल्हापुरी साज, दशावतारी हार, बाजूबंद जोड, पेट्याची बिंदी, चंद्रहार, मण्यांची कंठी, अष्टपैलू मण्यांची कंठी, लक्ष्मीहार, पुतळ्यांची माळ, रूळ जोड, पैंजण जोड, इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच राधिका मातेस चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, ठुशी, जवेची माळ, मोहरांची माळ व सत्यभामादेवीला ठुशी, जवेची माळ, हायकोल, पुतळ्यांची माळ अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आ-लेले आहेत. तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

**नवरात्री निमित्त परिवार देवता मंदिरात विशेष प्रसाद वाटप कार्यक्रम संपन्न**

नवरात्रीच्या पावन उत्सवाचे औचित्य साधून श्री अंबाबाई देवी मंदिर, श्री यल्लामा देवी मंदिर, श्री यमाई तुकाई देवी मंदिर, श्री पद्मावती देवी मंदिर, श्री रेणूकमाता मंदिर, श्री शाकंबरी देवी मंदिर व श्री लखुबाई देवी मंदिर येथे भाविकांना प्रसाद म्हणून नायलॉन शाबुदाणा वाटप करण्यात आला. या प्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, सदस्य संभाजी शिंदे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख अतुल बक्षी व सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला आहे, असे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगितले.

---

# शहीद भगतसिंग यांच्या कार्यापासून युवकांनी आदर्श घ्यावा : प्रा सौरभ भस्मे

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नालंदा वसतिगृहात शहिद भगतसिंग जयंतीनिमित्त अभिवादन**

अक्कलकोट /प्रतिनिधी : ब्रिटिशांच्या विरुद्ध बंड करून लाहोर कटकारस्थान करणारा योद्धा शहीद भगतसिंग हे देश प्रेमामुळे भारताच्या इतिहासात अजरामर झाले. युवकांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आ-पली जाज्वल्य देशभक्ती चिरंतन ठेवली पाहिजे,असे प्रतिपादन प्रा सौरभ भस्मे यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शहीद भगतसिंग यांची जयंती नालंदा वसतिगृहात साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी प्रा भीम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे, जनाबाई चौधरी, विद्याश्री



वाले, विद्या बिराजदार उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शहीद भगतसिंग यांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ रोजी पंजाब प्रांतातील बांगा गावात झाला. अवघ्या २३ व्या वर्षी त्यांनी फाशीची शिक्षा पत्करली. त्यांच्याबरोबर राजगुरू, सुखदेव यांना देखील ब्रिटिशांनी फाशीची शिक्षा दिली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख योद्धा म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना शहीद ए आझम महान शहीद म्हणून गौरविले जाते. ते देश प्रेमी म्हणून इतिहासामध्ये परिचित आ-हेत. परकीय सत्तेच्या अन्यायाविरुद्ध त्यांनी लढा दिला. सध्या जागतिक राजकारणात भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये शीत युद्ध सुरू आहे, भारतावरील कर अमेरिकेने वाढविला आहे. टॅरिफ वाढवल्यामुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत युवकांनी देश प्रेम दाखविले पाहिजे. युवकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वदेशीचा पुरस्कार केला पाहिजे. स्वदेशी वस्तू वापरल्या पाहिजेत.

कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका शितल झिंगाडे यांनी केले.

प्रास्ताविक प्रा. भीम सोनकांबळे यांनी केले, आभार प्रा. मनीषा शिंदे यांनी मानले. यशस्वीतेसाठी सचिन नरूणे, बालाजी कांबळे, निंगप्पा होटगे यांनी प्रयत्न केले.

---

# कर्तव्यासोबत भक्ती पण भावनांना ठेच लागली असेल तर क्षमस्व : जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
धाराशिव प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : धाराशिव जिल्ह्यात एकाच वेळी दोन जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणाऱ्या परिस्थितीत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार काम करत आहेत, एकीकडे जिल्ह्या-तील अतिवृष्टी व पूरपरिस्थितीने जनजीवन विस्कळीत झाले असून हजारो कुटुंबे उघड्यावर आली आहेत, तर दुसरीकडे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीजींचा शारदीय नवरात्र महोत्सव उत्साहात सुरू आहे. या दुहेरी जबाबदाऱ्यांमध्ये जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी मंदिर संस्थान समितीचे अध्यक्ष या नात्याने धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत असतानाच आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून बचाव व मदत कार्यात ही आघाडी घेतली आहे आई तुळजाभवानी देवीच्या कृपेनेच आम्ही ही जबाबदारी पार पाडत आहोत जिल्ह्यातील जवळपास दोन हजार अधिकारी कर्मचारी एन.डी.आर एफ सेना व मंदिर प्रशासनातील कर्मचारी हे आपापल्या जबाबदाऱ्या सांघिक भावनेने पार पाडत आहेत.

अनेक अधिकारी कर्मचारी मागील चार-पाच दिवस घराकडे गेलेले ही नाहीत. २२ सप्टेंबर रोजी घटस्थापने नंतर जिल्हाधिकारी श्री पुज-ार हे तातडीने आपत्तीग्रस्त भागात पोहोचले ज्या दिवशी उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, आ-पत्ती निवारण मंत्री, तसेच आरोग्य मंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यावर नुकसानीची पाहणी करण्यासाठी आले असता, जिल्हाधिकारी हे प्रत्यक्ष सोबत राहून पाहणी दरम्यान करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती देत होते. मात्र महोत्सवातील परंपरा व जबाबदारी लक्षात घेऊन ते अल्पवेळासाठी मंचावर गेले असता कलाकारांनी आग्रहाने त्यांना उपस्थितांचे स्वागत करण्यासाठी बोलावले त्या क्षणी जिल्हाधिकारी म्हणूनच नव्हे तर एक भाविक भक्त म्हणून देवीच्या स्तवनात सहभागी झाले. जर या कृतीमुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मनापासून दिलगिरी व्यक्त करतो, असे जिल्हाधिकारी पुजार यांनी म्हटले आहे. जिल्ह्यातील या आगळ्यावेगळ्या परिस्थितीत प्रशासनाचे सांघिक काम आणि जिल्हाधिकाऱ्यांची समतोल भूमिका दिसून येत आहे.

---

# निलंगा डीवायएसपी विशाल ढुमे यांनी केली शेडोळ येथे अतिवृष्टीची पाहणी



लातूर प्रतिनिधी/अमर जाधव

निलंगा येथे नव्यानेच रुजु झालेले डी वाय एस पी विशाल ढुमे यांनी शेडोळ येथे अतिवृष्टी व ढगफुटी सद्रश पाउस झाल्याने शेतीपिक व पडझड झालेल्या घराची ,पाहणी केली शेडोळ ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देऊन शेतकऱ्यांना आधार देत धीर देऊन शेती पिकांची नुकसानीची पाहणी केली शेतकर्यांनी खचुन जाउ नये येणाऱ्या अडचणीला सामोरे जावे व कांहीं आडचन भासल्यास त्वरित संपर्क साधून त्या अडचणी चे समाधान करण्याचे आश्वासन देऊन धीर दिला.

यावेळी उपस्थित शेडोळ येथील मान्यवर .सरपंच . स्वरूप विठलराव धुमाळ, उपसरपंच .विशाल धुमाळ,गुणवंत जाधव,तंटा मुक्ती अध्यक्ष .शंकर धुमाळ ,तलाठी डिगंबर वाघे , विठल धुमाळ बाब्रुवान हजारे, माधव पाटील, राहुल पाटील, संजय सावकार नरसींग धुमाळ, शिवराज ठमके, श्रीमंत जाधव, सचिन धुमाळ, सुदाम आवले, बालाजी श्रीरसागर, बाबुलाल पठाण, प्रा.सतीश गुरुजी धुमाळ वैभव धुमाळ, सचिन शिंदे,किरण धुमाळ, काका धुमाळ .सह शेतकरी व शेडोळ ग्रामस्थ उपस्थित होते.

---

**मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर**

**पुरग्रस्त नागरिकांना श्रींचा प्रसाद म्हणून महावस्त्रे वाटप**

# पूर परस्थिती; मुख्यमंत्री सहायता निधीस १ कोटीची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहेत. या परिस्थितीत मदतीचा हात पुढे करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील सर्व देवस्थानांना केले आहे.

या आवाहनास प्रतिसाद देत तसेच सामाजिक उत्तरदायित्व व मानवतावादी भूमिकेतून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने मुख्यमंत्री सहायता निधीस एक कोटी रुपयांची मदत व त्याचबरोबर पुरग्रस्त नागरिकांना श्रींच्या प्रसादरूपाने महावस्त्रे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.



मंदिर समिती प्रत्येकवेळी पुरग्रस्त नागरिकांना फुड पॅकेट वाटप करीत असते. ह्यावेळी जिल्हा प्रशासनास देखील आवश्यक ती मदत करण्यात येत असून, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, लाडूप्रसाद उपलब्ध करून देण्यात येत आहे. मंदिर समितीकडून यापूर्वीही राज्यावर आलेल्या आपत्तीच्या काळात मदत केली गेली आहे. विशेष म्हणजे सन २०१३, २०१५, २०१८ व २०२० या काळातही मंदिर समितीमार्फत मुख्यमंत्री सहायता निधीस प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत करण्यात आली होती.

**श्रीं विठ्ठल रूक्मिणी मातेच्या कृपेने संकटकाळात समाजाच्या सेवेसाठी पुढे येणे हीच खरी विठ्ठलभक्ती आहे. पुरग्रस्तांना मदत करणे ही मंदिर समितीचे सामाजिक व नैतिक कर्तव्य असून या आपत्तीमध्ये मंदिर समितीमार्फत प्रशासनास आवश्यक ती मदत करण्यात येत आहे.**
**– गहिनीनाथ महाराज औसेकर (सह–अध्यक्ष)**



मंदिर समितीची सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.२६ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता दुरदृष्य प्रणा-लीद्वारे सभा संपन्न झाली. या सभेस सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते. या सभेत शासन मान्यतेने मुख्यमंत्री सहायता निधीस १ कोटीची मदत तसेच श्री रूक्मिणीमातेचा प्रसाद म्हणून महावस्त्रे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.